# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १७.०८.२०२६ सोमवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.**

पोलीस ठाणे नविन कामठी हद्यीत, श्रीकृष्ण नगर, रनाळा, येथील बांधकाम साईडवर टिनाचे शेडमध्ये राहणारे फिर्यादीची आई सौ. शामावती उमाशंकर वट्टी, वय ५५ वर्षे आणि वडील उमाशंकर थानसिंग वट्टी, वय ६४ वर्षे हे दोघेही मजुरीचे काम करतात. त्यांचेसोबत फिर्यादीचा भाचा अरूण राजेश मसराम, वय ११ वर्षे हा सुध्दा राहतो. दिनांक १६.०८.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, फिर्यादीचे आई—वडील दोघेही घरी असतांना, त्यांचेमध्ये दारू पिवुन झगडा—भांडण झाले. भांडणामध्ये फिर्यादीचे वडीलांनी त्यांचे आईला हातबुक्कीने मारहाण केली व जिवे मारण्याचे उद्येशाने डोके जमीनीवर आपटुन गंभीर जखमी केले. गंभीर जखमी फिर्यादीचे आईला उपचाराकरीता, उपजिल्हा रूग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे आईस तपासुन मृत घोषित केले.

यांप्रकरणी फिर्यादी शैलेंद्र उमाशंकर वट्टी, वय २१ वर्षे, रा. नगरवाडा, जि. बालाघाट, मध्यप्रदेश, ह.मु. नगरधन, रामटेक, जि. नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे नविन कामठी येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलीसांनी आरोपी उमाशंकर थानसिंग वट्टी, वय ६४ वर्षे यांस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १६.०८.२०२६ चे १५.४५ वा. चे सुमारास, भांडेवाडी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत बिडगांव नगरपंचायत जवळील सरगम हॉटेलमागे मोकळ्या जागेत काही इसम ताशपत्त्यांवर जुगार खेळत आहेत. अशा प्राप्त माहितीवरुन घटनास्थळी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, त्याठिकाणी आरोपी क्र. १) समीर शेख मोहम्मद शेख, वय ४५ वर्षे, रा. २) ईरफान शेख बशीर शेख, वय ३९ वर्षे, दोन्हीही रा. मस्जीद जवळ, बिडगांव, भांडेवाडी ३) नवनित सुरेश शेवाने, वय २८ वर्षे, रा. आराधना नगर, बिडगांव, भांडेवाडी ४) बबन चिनबाजी बुरडकर, वय ५५ वर्षे, रा. जुनी वस्ती बिडगांव, भांडेवाडी, ५) संदीप भिमराव दुपारे, वय ४२ वर्षे, रा. प्लॉट नं. १६४, साईबाबा नगर, बिडगांव, भांडेवाडी हे ताशपत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन डावावरील रोख १,७२०/—रू., ताश पत्ते, ०३ वेगवेगळया कंपनीचे मोबाईल व इतर साहित्य असा एकुण ३५,७२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यांप्रकरणी फिर्यादी पोअं. भुषण झरकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे भांडेवाडी येथे आरोपींविरूध्द कलम १२ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नंदनवन :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १५.०८.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक १६.०८.२०२६ चे २०.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत प्लॉट नं. ४५, घरसंसार सोसायटी, गल्ली नं. ३, वाठोडा रोड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी गणेश तुळशिराम कद्रे, वय ५६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह सालबर्डी येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, लोखंडी कपाटाचे कुलुप तोडुन त्यातील रोख ३,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ७,०१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. निलेश दळवी ७०२०३६१३९६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** सौ. दुर्गा योगराज गजभिये, वय ४५ वर्षे, रा. गल्ली नं. १०, पाण्याचे टाकीजवळ, इंदोरा मैदान, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १४.०८.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे सक्करदरा :—** सौ. हिना कौसर उर्फ अफशा शेख अकबर, वय ३४ वर्षे, रा. मोठा ताजबाग, औलीया नगर, सक्करदरा, नागपूर ह्या दिनांक १६.०८.२०२६ चे १५.३० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ४ इंच, केस— काळे लांब, अंगात— सलवार सुट व नकाब घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतात. ओळख— हातावर जुन्या माराचे निशान आहे व बोट मोडलेले आहे.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :—** श्रीमती मंजुषा सतीष वासनिक, वय ४० वर्षे, रा. प्लॉट नं. २४६, मिसाळ ले—आऊट, चैतन्य शाळेजवळ, जरीपटका, नागपूर ह्या दिनांक १४.०८.२०२६ चे १७.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब, भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**४) पोलीस ठाणे सक्करदरा :—** प्रदीप राजकुमार गुप्ता, वय ३७ वर्षे, रा. भांडेप्लॉट चौक, फुटपाथवर, नागपूर हे दिनांक २०.०६.२०२६ चे १९.०० वा. पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील तुकडोजी पुतळा येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे, अंगात— फुल शर्ट व फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— डाव्या हातावर 'प्रदीप राजकुमार गुप्ता' असे नांव गोंदलेले आहे. दोन्हीही हातावर चिरे मारल्याचे निशान आहे.

**५) पोलीस ठाणे अंबाझरी :—** गौरव अनिरूध्द सिंह, वय २२ वर्षे, रा. सातनुर, तह. सौसर, जि. पांढुर्णा, ह.मु.— गोकुळपेठ, हनुमान मंदीर समोर, रिठेचे घरी किरायाने, अंबाझरी, नागपूर हा दिनांक १४.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरून कामावर जातो असे निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला

असता मिळून आला नाही. सोबत असलेला मोबाईल फोन बंद आहे. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ६ इंच, केस– काळे, भाषा– हिंदी बोलतो. ओळख– हातात स्टीलचे कडे घातलेले आहे.


सौ. दुर्गा


सौ. हिना


श्रीमती मंजुषा


प्रदीप


गौरव

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४६३२/ २००७ | कलम ३९७, ४६५, ४६८, ४७१, ४२० भा.दं.वि. | अचल उर्फ संध्या भीकारू शेंडे, वय २७ वर्षे, रा. हिल टॉप, रामनगर, अंबाझरी, नागपुर | १९.०८.२०२६ |
| २. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०४०२६३ /१९९७ | कलम ३२४ भा.दं.वि. | भुपेंद्रसिंग नरेंद्रसिंग बसिन, रा. लोकमत प्रेस मागे, नागपुर | २०.०८.२०२६ |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

दिनांक १०.०८.२०२६ ते दिनांक १४.०८.२०२६ दरम्यान भाहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीतपणे पार पाडण्याकरिता नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व वाहतुक विभागाच्या वतीने संयुक्त कारवाई करण्यात आलेली आहे. त्यादरम्यान सर्व वाहतुक परिमंडळ हद्दीत महत्वाचे व मुख्य रहदारीचे चौकात नाकाबंदीसह

ड्रंकनड्राईव्ह मोहिम राबविण्यात येवुन मद्यप्राशन करून वाहन चालविऱ्या **१२२** वाहन चालकांविरूध्द ड्रंकनड्राईव्ह अंतर्गत कारवाई करून मा. मोटरवाहन न्यायालय येथे आरोपपत्र दाखल केल्यानंतर मा. मोटरवाहन न्यायालयातर्फे एकुण **१६,८७,०००/—** रू. चा दंड ठोठावण्यात आलेला आहे.

मोटार वाहन कायद्यान्वये लायसंन्स असलेल्या टु—व्हिलर चालकांस ११,०००/—रू. व लायसंन्स नसलेल्या टु—व्हिलर चालकांस १६,०००/—रू. तसेच, लायसंन्स असलेल्या फोर व्हिलर चालकांस १३,०००/— रू. त्याचप्रमाणे ट्रक व तत्सम जड वाहनांवर २० ते २५ हजार रूपये आणि रिपीट चालान असल्यास निर्धारीत रकम व्यतिरीक्त ५,०००/— रू अतिरीक्त दंड आकारण्यात येत आहे.

यापुढेसुध्दा ही नमुद कारवाई सुरू राहणार असुन, मद्यप्राशन करून वाहन चालविऱ्या तसेच, वाहतूक नियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल.

तरी सर्व वाहन चालकांनी आपले व ईतरांचे सुरक्षिततेच्या दृष्टिने सर्व वाहतुक नियमांचे पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करण्याचे आवाहन करीत आहोत.



( **आदित्य मिरखेलकर, भापोसे.** )
पोलीस उप आयुक्त वाहतुक,
नागपुर शहर